डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in


# महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील, मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी- मांग, मांग- म्हशी,मदारी, गारुडी, राधे मांग, मांग-गारोडी, मांग- गारूडी युवक-युवतींसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इ.मध्ये लिपिक वर्गीय स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी मोफत अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी- मांग ,मांग- म्हशी,मदारी, गारुडी, राधे मांग, मांग- गारोडी, मांग- गारूडी युवक – युवतींसाठी **लातूर जिल्ह्याकरीता विद्यार्थ्यांना आय.बी.पी.एस., एल.आय.सी., रेल्वे, बँक लिपीक व तत्सम पदांच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी** नि:शुल्क निवासी प्रशिक्षणाकरीता **यशवंतराव चव्हाण समाज विकास प्रतिष्ठाण, लातूर** या जिल्ह्याच्या ठिकाणी खालील नमूद प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. करिता पात्र उमेदवारांकडून दिनांक **०५ डिसेंबर, २०२३** पासून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव व जिल्ह्याचे नाव | एकूण जागा |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण समाज विकास प्रतिष्ठाण, लातूर | १५० |
| | एकूण | १५० |

**पात्रता :**

१) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी- मांग, मांग- म्हशी,मदारी, गारुडी, राधे मांग, मांग- गारोडी, मांग- गारूडी घटकातील असावा.
२) उमेदवाराचे वय वर्ष १८ ते ३४ पर्यंत असावे.
३) उमेदवार किमान १२ वी उत्तीर्ण असावा.
४) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.
५) उमेदवार दिव्यांग असल्यास ४०% पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाचा दाखला सांक्षाकित प्रत सादर करावी.

अर्ज करण्यासाठी QR scan करा

**विद्यार्थी निवडीचे निकष :**

- एकूण प्राप्त अर्जातील उमेदवारांची चाळणी परीक्षेद्वारे गुणवत्ता यादी नुसार निवड करण्यात येईल.
- पात्र उमेदवारांची उत्पन्न मर्यादा रु.८ लाखांपर्यंत असावी.
- चाळणी परीक्षेचे स्वरूप :- संबंधित पूर्व प्रशिक्षण आय.बी.पी.एस., एल.आय.सी., रेल्वे, बँक लिपीक व त्या समकक्ष पदांच्या परीक्षेच्या धर्तीवर असेल.

**आरक्षण :**

- ३० % जागा महिलांसाठी राखीव
- ४ % जागा दिव्यांगाकरीता राखीव

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :**

- **ऑनलाईन नोंदणी करण्याची शेवटची तारीख २०/१२/२०२३**
- प्रशिक्षण कालावधी – ०६ महिने (अनिवासी)
- निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान ७५% टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहिल्यास त्या प्रशिक्षणार्थीना दरमहा रु.६,०००/- एवढे विद्यावेतन अदा करण्यात येईल.
- निवड झालेल्या पात्र प्रशिक्षणार्थीना पुस्तक संचाकरीता प्रती प्रशिक्षणार्थी रु.५०००/- एवढी रक्कम अदा करण्यात येईल.
- सदर योजनेबाबत / प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच/प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे सर्व अंतिम अधिकार मा. महासंचालक, बार्टी यांना राहतील.
- प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.
- ज्या उमेदवरांनी यापूर्वी बार्टी मार्फत (MPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, UPSC नागरी सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण आणि बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांचे यापूर्वी प्रशिक्षण घेतले असेल त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.

**अर्ज करण्याची अंतिम दिनांक व ऑनलाईन अर्ज करण्याकरिता लिंक**

इच्छुक व पात्र उमेदवारांनी **दि.२०/१२/२०२३** पर्यंत https://forms.gle/zhv9ABeR1tr3JFVw9 या लिंकवर ऑनलाईन अर्जाची नोंदणी करावी.

5/12/23

महासंचालक,
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**